# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग

दि.२२/०९/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ‘एच’ नवघर-माणिकपूर मार्फत दिनांक २२ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता **‘जलशक्ती अभियान – कॅच द रेन २०२२’** अंतर्गत नागरिकांच्या जनजागृतीपर **प्रभाग समिती ‘एच’ कार्यालयापासून ते बहुद्देशीय इमारत दिवाणमान तलाव** या ठिकाणापर्यंत **जनजागृती रॅली** काढण्यात आली. जलशक्ती अभियानाअंतर्गत पाणी साठवणे, पारंपारिक साठ्याचे मार्ग पुनरुज्जीवित करणे, पाण्याचा पुनर्वापर करणे, पाणलोट क्षेत्राचा विकास, वृक्ष लागवड व संवर्धन इ.उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत. मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार, मा.माजी महापौर श्री.नारायण मानकर, मा.माजी उप-महापौर श्री.प्रकाश रॉड्रीग्ज, मा.अति.आयुक्त श्री.अजिंक्य बगाडे व इतर उपस्थित मान्यवर यांचे शुभहस्ते झेंडा दाखवून सदर रॅलीची सुरुवात करण्यात आली. रॅलीच्या कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व उपस्थितांनी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या दिवाणमान येथील जलशक्ती केंद्रास भेट दिली.

या जनजागृती रॅलीत शाळा-महाविद्यालयाचे विद्यार्थी, नागरिक व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाणीपुरवठा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका